(??) (ग्रामगा)
(महात्मा गांधी त.मु.गाव)

GMGT070802

**महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम**
**प्रसिध्दीसाठी वृत्तपत्राच्या बातमीदारांना पुरस्कार देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**

शासन निर्णय क्र.तंमुगा/१००८/प्र.क्र.१९/पोल-१५
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक : ३१ जुलै, २००८.

**वाचा :-** १) गृह विभाग शासन निर्णय क्र.एमआयएस-१००७/सीआर-२३८/पोल-८, दिनांक १९.७.२००७.
२) शासन निर्णय क्र.तंमुगा/१००८/प्र.क्र.१९/पोल-१५, दि. ११ एप्रिल, २००८.
३) शासन निर्णय क्र.तंमुगा/१००८/प्र.क्र.१९/पोल-१५, दि. १४ जुलै, २००८.

**शासन निर्णय :-** संदर्भित दिनांक १९ जुलै, २००७ च्या शासन निर्णयान्वये राज्यात महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिम दिनांक १५.८.२००७ पासुन सुरु करण्यात आली आहे. दिनांक ११ एप्रिल, २००८ च्या शासन निर्णयान्वये मोहिमेच्या प्रसिद्धीसाठी वृत्तपत्राच्या बातमीदारांना पुरस्कार देण्याबाबत अटी व शर्ती विहित करण्यात आल्या असून जिल्हास्तर, विभागस्तर व राज्यस्तरावरील पुरस्कारासाठी समित्यांची रचना विहित केली आहे. त्याप्रमाणे दिनांक १४ जुलै २००८ च्या शासन निर्णयाव्दारे राज्यस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे त्यात मा. उपमुख्यमंत्री (गृह) राज्यस्तरावरील समितीचे अध्यक्ष असून मा. राज्यमंत्री (गृह) हे सदस्य आहेत. सदर समितीच्या रचनेत बदल करण्यात येत असून मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांच्या ऐवजी मा. राज्यमंत्री (गृह) हे समितीचे अध्यक्ष राहतील.

२. सदर शासन निर्णय राज्य शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संकेतांक २००८०७३११६०३१४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

मा.आ.गुट्टे

( मा.आ.गुट्टे )
अवर सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव.
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव.
सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव.
सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष.
मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
सर्व प्रशासकीय विभागांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक.
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
सर्व पोलीस अधीक्षक.
सर्व उप विभागीय अधिकारी (जिल्हाधिकारी यांचे मार्फत)
सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी (पोलीस अधीक्षक यांचे मार्फत)

संचिकेत जमा केले.